निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : १९६ वा.
शुक्रवार - १९ सप्टेंबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247


## ‘केंब्रिज’सोबतचा सामंजस्य करार जागतिक दर्जाच्या शिक्षणाचा नवा टप्पा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/**महाराष्ट्रात विद्यार्थी आणि शिक्षकांची संख्या मोठी असून केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंट इंडियाकडे कौशल्य आहे. दोघांमधील सामंजस्य करार हा राज्यातील शालेय शिक्षणाला जागतिक दर्जा प्राप्त होण्यासाठीचा नवा टप्पा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत शालेय शिक्षण विभाग आणि केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंट इंडीया दरम्यान सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर केंब्रिजच्या वतीने आंतरराष्ट्रीय शिक्षण गटाचे व्यवस्थापकीय संचालक रॉड स्मिथ आणि राज्याच्या वतीने शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांनी स्वाक्षरी केली. शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, मुख्यमंत्री कार्यालयाच्या अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार, मुख्यमंत्री कार्यालयाचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन, केंब्रिजच्या दक्षिण आशियाचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि व्यावसायिक प्रमुख मनीष दोषी आदी यावेळी उपस्थित होते.


मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानंतर पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळविण्याच्या दिलेल्या संधीच्या दिशेने महाराष्ट्राने प्रवास सुरू केला आहे. या करारामुळे केंब्रिजचे कौशल्य आणि राज्यातील शिक्षण क्षेत्र एकत्र आल्याने विद्यार्थ्यांना असे शिक्षण मिळवून देता येईल. या करारामुळे तो प्रवास अधिक फलदायी ठरेल. केंब्रिज हे शिक्षण क्षेत्रातील सर्वात मोठे नाव असल्याचे नमूद करताना त्यांनी, केंब्रिजने शिक्षण क्षेत्रात विकसित केलेल्या चांगल्या पद्धतींमुळे राज्यातील विद्यार्थ्यांना मोठा फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला. आज आपण सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे, तथापि हे पहिले पाऊल असून अजून मोठा प्रवास बाकी आहे. या प्रवासात आपण केंब्रिजसोबत भागीदार राहणार आहोत. मी स्वतः या कराराच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणार असल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

‘केंब्रिज’सोबतचा करार शालेय शिक्षणात ऐतिहासिक पाऊल – डॉ. पंकज भोयर

महाराष्ट्र राज्य प्रशासन, पायाभूत सुविधा आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांत सातत्याने नवे आदर्श निर्माण करत आहे. आज केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंटसोबत झालेल्या सामंजस्य करारामुळे शालेय शिक्षणात जागतिक दर्जाकडे एक पाऊल पुढे टाकले गेले आहे, असे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी यावेळी सांगितले. हा करार विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणारा आणि नव्या पिढीतील नाविन्यपूर्ण व नेतृत्वक्षम तरुणांना दिशा देणारा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राज्यात पीएम श्री स्कूल्स सुरू असून त्या शाळा शैक्षणिक उत्कृष्टता, कौशल्य विकास आणि सर्वांगीण शिक्षणासाठी आदर्श ठरणार आहेत. आपल्या शासकीय व अनुदानित शाळांमध्ये लाखो सामान्य कुटुंबातील मुले असामान्य स्वप्ने पाहतात. या मुलांना केवळ शिक्षण नव्हे तर दर्जेदार गुणवत्ता प्रमाणपत्र मिळावे, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आजच्या करारामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळण्याकडे आपण पुढे पाऊल टाकले असल्याचे डॉ. भोयर म्हणाले.

या ज्ञान भागीदारीतून हवामान शिक्षण, अभ्यासक्रम सुधारणा, ग्रंथालय व शैक्षणिक साधनसंपत्ती उपलब्ध करून देणे, शिक्षक क्षमतावृद्धी आणि ओपन स्कूलिंग उपक्रम हाती घेतले जाणार आहेत. ही मोहीम केवळ गुणपत्रिका सुधारण्यापुरती मर्यादित नसून विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, कौशल्य व जागतिक स्तरावरील तयारी देण्यासाठी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील ‘विकसित भारत’ दृष्टीकोनातून महाराष्ट्र शिक्षण क्षेत्रात देशाचे नेतृत्व करेल, असा विश्वास डॉ. भोयर यांनी व्यक्त केला. केंब्रिजसोबतच्या करारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.



प्रधान सचिव देओल यांनी प्रास्ताविकात या कराराबाबत माहिती दिली. तर, केंब्रिजचे रॉड स्मिथ यांनी महाराष्ट्र शासनासोबतचा करार हा आमचा सन्मान असल्याची भावना व्यक्त करुन शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करू असे सांगितले. हा करार इतर राज्यांसाठी आदर्श ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

केंब्रिज आणि शालेय शिक्षण यांच्यातील सामंजस्य कराराविषयी

शालेय शिक्षण विभाग व केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंट इंडीया यांच्यातील सामंजस्य करार हा महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार शिक्षकांच्या सतत व्यावसायिक विकासावर भर देणे आवश्यक आहे. राज्यातील शिक्षकांना प्रशिक्षण देताना परिणामकारकता व गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहकार्य घेण्यात येणार आहे.केंब्रिजकडे जागतिक दर्जाचे शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, पाठ्यपुस्तके, डिजिटल सामग्री व नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती उपलब्ध आहेत. या सामंजस्य कराराअंतर्गत केंब्रिज शिक्षकांसाठी विषयानुरूप प्रशिक्षण कार्यक्रम, राष्ट्रीय शिक्षण धोरणास अनुरूप आणि सीबीएसई-सुसंगत शैक्षणिक साधनसामग्री, आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्रे तसेच विद्यार्थ्यांसाठी ‘क्लायमेट क्रेस्ट’ सारखा हवामान शिक्षण कार्यक्रम व पूर्व-प्राथमिक अभ्यासक्रम उपलब्ध करून देणार आहे. याशिवाय डिजिटल साक्षरता, आयसीटी आधारित शिक्षण, जीवनकौशल्ये व मूल्यशिक्षणाशी संबधित अभ्यासक्रमही राज्यातील शाळामध्ये राबवले जातील.


या करारामुळे शिक्षकांच्या गुणवत्तेत वाढ होऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक परिणामामध्ये सुधारणा होईल. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पद्धतीचा लाभ ग्रामीण ते शहरी सर्व शाळांना मिळेल, हवामान शिक्षण व डिजिटल कौशल्यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना सज्ज करता येईल. यामुळे राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होईल आणि महाराष्ट्राची शिक्षणव्यवस्था अधिक समावेशक, गुणवत्तापूर्ण व जागतिक मानकाशी अनुरूप बनेल. राज्यातील शिक्षकांना केंब्रिज प्रेस आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षक विकास कार्यक्रम, सेल्टा व आयकेआय सारख्या जागतिक मान्यताप्राप्त पात्रता तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी सुसंगत के-१२ शैक्षणिक साधने उपलब्ध करून शिक्षक क्षमता वृद्धी, दर्जेदार अध्यापन आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल. तसेच या कराराद्वारे महाराष्ट्र शासनाला राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करता येईल. शिक्षक व विद्यार्थी दोघांनाही जागतिक दर्जाचे संसाधन उपलब्ध होतील. शिक्षण प्रणालीत नवोन्मेष व गुणवत्ता येईल आणि राज्याच्या शिक्षणव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त होईल. हा करार महाराष्ट्रातील शाळांना ‘भविष्यकालीन, समावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षण’ देण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.

## संक्षिप्त

### गल्लेबोरगावत विहिरीत बिबट्या आढळल्याने खळबळ, ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/प्रतिनिधी**/खुलताबाद तालुक्यातील गल्लेबोरगाव येथे भक्ष्याच्या शोधात असलेला बिबट्या रात्रीच्या सुमारास खोल विहिरीत पडला. गुरुवार (दि.१८) रोजी सकाळी या घटनाची माहिती वारे सारखी पसरल्याने घटनास्थळावर ग्रामस्थांची गर्दी झाली होती



याबाबत अधिक माहिती अशी की खुलताबाद तालुक्यातील गल्लेबोरगाव येथील शेतकरी फुलचंद बंन्सी बारवाल यांच्या गट नंबर ११८ मधील खोल विहिरीमध्ये नर जातीचा बिबट्या पडला असल्याची माहिती खुलताबाद वन विभागाला शेजारीच राहणारे उप सरपंच कांताबाई दिलीप बेडवाल यांनी दिली.

माहिती मिळताच वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी दाखल होऊन वन विभागाच्या टीमने या बिबट्याला सुरक्षित विहिरीच्या बाहेर काढत पिंजऱ्यात ठेवून उपचार करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे नेण्यात आले.याप्रसंगी खुलताबाद वनपरिक्षेत्राधिकारी निखिल देशमुख, वनपाल संदीप मोरे, वनरक्षक मयूर चौधरी, वनरक्षक,वन मजूर बबन सोनवणे बबन म्हसरुप, छत्रपती संभाजीनगर रेस्क्यू टीमचे अशिष जोशी, शुभम साळवे,सुरज पानकडे, दीपक वटाणे, हर्ष केवारे शेतकरी दिलीपसिंह बेडवाल, पोपट बैनाडे, रामसिंग लखवाल, रवि बारवाल, विशाल लखवाल, फुलचंद बारवाल, आजिनाथ ठोकळ, नाना औटे यांच्यासह मोठा गावातील नागरिक उपस्थित होता.

### वडगाव कोल्हाटी, दौलताबाद, रामपुरीतील ३१ जणांवर वीजचोरीचे गुन्हे दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** तालुक्यातील वडगाव कोल्हाटी, दौलताबाद व रामपुरी येथे अनेक ठिकाणी वीजचोरीचे प्रकार महावितरणच्या धडक मोहिमेत उघड झाले. याप्रकरणी छावणी पोलिस ठाण्यात ३१ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

महावितरणच्या वाळूज महानगर शाखा व दौलताबाद शाखेच्या कर्मचाऱ्यांनी तपासणी मोहीम राबवली. त्यात काही नागरिक लघुदाब वाहिनीवर आकडे टाकून व मिनी पिलरमधून अनधिकृतपणे वीज वापर करताना आढळून आले. वडगाव कोल्हाटी येथे शिवाजी सोपान गायके, भीमाशंकर भगवान चौधरी, अशोक पांडुरंग चव्हाण, किशोर सीताराम मुळे, अनिल रतन वाघ, महादू एकनाथ सईवर, माऊली नवृत्ती खेकेडे, दादाराव विष्णू मोरे, विठ्ठल माधू पवार, विलास कैलाश भवरे, राम खंडू पुणेकर, प्रशांत अण्णासाहेब वाघ, चेतन भिकन पाटील, गणेश देवूबा गोरडे, सुरेश हरिदास गायकवाड, विठ्ठल कचरू मते, दौलताबाद येथील फराह नाज मोहम्मद, अजीम पटेल, मोहम्मद मदनजीर, ज्ञानेश्वर अमृत साळवे, मक्रनाथ शिवनाथअप्पा ठेंगे, रामपुरी येथील गंगाधर गिरजाजी गुंजाळ, साहेबराव मोरे, दीपक राजू मोरे, प्रदीप नामदेव वाहूळ, रघुनाथ शेकुजी किर्तीकर, बन्सी पवार, शिवाजी धरू सुधा, संतराम वाहूळ, गोविंद प्रकाश राठोड, किसन वाहूळ हे वीजचोरी करताना सापडले. महावितरणने या सर्वांना वीजचोरीची निर्धारित बिले दिली. मात्र ती भरण्यास आरोपींनी टाळाटाळ केली. अखेर छावणी पोलिस ठाण्यात ३१ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

### खरीप हंगाम २०२५ साठी शेतकरी स्तरावरील ई-पीक पाहणीस मुदतवाढ

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/**खरीप हंगाम २०२५ करिता मोबाईल अँप द्वारे शेतकरी स्तरावरून ई-पीक पाहणी नोंदणी करिता उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यात बऱ्याच ठिकाणी अतिवृष्टी, दुबार पेरणी या कारणांमुळे शेतकरी ई-पीक नोंदणी करु शकले नाही. याकारणास्तव शेतकरी पीक नोंदणी करण्यापासून वंचित राहू नये म्हणून शेतकरी स्तरावरून पीक नोंदणीसाठी २० सप्टेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर उर्वरित शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी दिनांक २१ सप्टेंबर २०२५ ते ०४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत सहायक स्तरावरून पूर्ण करता येईल, असे जमाबंदी आयुक्त कार्यालय पुणे यांचेमार्फत कळविण्यात आले आहे.छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये दिनांक १३ सप्टेंबर २०२५ ते आजपर्यंत अतिवृष्टी झाली आहे. बऱ्याच शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचल्याने शेतात जाता येत नाही, तसेच बऱ्याच ठिकाणी ई-पीक पाहणी सर्वर डाऊन असणे, शेतकऱ्यांच्या जमिनीचे लोकेशन बरोबर दाखवत नसणे, शेतकऱ्यांचे खाते क्रमांक जुळत नसणे ई. अडचणीमुळे शेतकरी ई-पीक नोंदणी करु शकले नाहीत. या कारणास्तव शेतकरी पीक नोंदणी करण्यापासून वंचित राहू नये याकरिता जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमि अभिलेख पुणे यांचे दिनांक १८ सप्टेंबर २०२५ रोजीच्या पत्रानुसार शेतकरी स्तरावरून करावयाच्या ई पीक पाहणीसाठी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.३० सप्टेंबर २०२५ पूर्वी सर्व शेतकऱ्यांनी त्यांची ई-पीक पाहणी करुन घ्यावी, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

## घनसावंगी तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा-मागणीसाठी पुंगीबजाव मोर्चा

**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी (प्रतिनिधी)** घनसावंगी तालुक्यातील शेतकरी बांधवांनी ओला दुष्काळ जाहीर करा या प्रमुख मागणीसाठी युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने तहसील कार्यालयावर पुंगीबजाव मोर्चा काढला. आज झालेल्या या आंदोलनात तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.मोर्चादरम्यान शेतकरी महिला व मुलींच्या हस्ते मा. तहसीलदार श्रीमती वंजारी यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात यावे. या निवेदनात शेतकऱ्यांच्या ओल्या दुष्काळाशी संबंधित विविध मागण्यांचा समावेश करण्यात आला होता.या वेळी तालुका कृषी अधिकारी श्री. सखाराम पवळ उपस्थित होते. तसेच पोलीस प्रशासन व पत्रकार बांधवांनी यासाठी सहकार्य केले. आंदोलनकर्त्यांनी यांचे मनःपूर्वक आभार मानले.युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने चेतावणी देण्यात आली की, येत्या आठ दिवसांत जर शासनाने अतिवृष्टीग्रस्त भागाबाबत ओला दुष्काळ जाहीर करण्याचा आदेश काढला नाही, तर तालुक्यातील शेतकऱ्यांकडून मोठे व तीव्र जनआंदोलन उभारले जाईल.

## पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्याकडून अतिवृष्टीने नुकसान झालेल्या नागरिकांना मदतीचे आश्वासन

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/ प्रतिनिधी/** पैठण तालुक्यात मागील काही दिवसांपासून पावसाने अक्षरशः थैमान घातले असल्याने पिंपळवाडी पिराची, मुधवाडी,कातपूर, राहुलनगर ,राजीवनगर,संजयनगर, दाळवाडी या परिसरातील नागरी वसाहती मध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या घरात कंबरे इतके पावसाचे पाणी घुसल्याने काही ठिकाणी घरांची पडझड होऊन अनेक नागरिकांच्या अन्न धान्यासह जीवनावश्यक वस्तूंची मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने छत्रपती संभाजी नगरचे पालकमंत्री तथा सामाजिक न्यायमंत्री ना.संजय शिरसाठ, आमदार विलास (बापू ) भुमरे यांनी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या राहुलनगर, कातपूर, राजीवनगर येथील नागरिकांशी संवाद साधत पाहणी करून तात्काळ नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश देत नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन देण्यात आले.




यावेळी उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, तहसीलदार ज्योती पवार,ग्रामसेवक पठारे,कदम मंडळ आधिकारी सीमा भोसले यांच्यासह कातपूरचे सरपंच सविता धनंजय मोरे, उपसरपंच माया विजय खडसन, सदस्य भाऊसाहेब खुटेकर,आशिष जाधव, अविनाश मिसाळ, गंगाधर म्हस्के सचिन बनकर,लक्ष्मण निकाळजे, आणि गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## बांबू लागवड शेतकऱ्यांना लखपती बनवणारी - ‘मनरेगा’चे महासंचालक नंदकुमार

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** बांबू लागवड ही एक उत्तम आर्थिक आणि पर्यावरण संरक्षण करून शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा फायदेशीर आणि शाश्वत स्रोत बनण्यासोबतच, पर्यावरणाच्या संवर्धनातही महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे, शेतकऱ्यांनी बांबू लागवडीचा विचार करणे फायदेशीर ठरणारे असून शेतकऱ्यांना लखपती बनवणारे हे पीक असल्याचे ‘मनरेगा’चे महासंचालक नंदकुमार यांनी सांगितले.यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह येथे आंतरराष्ट्रीय बांबू दिनानिमित्त चर्चासत्र झाले. यावेळी डेहराडून संशोधन संस्थेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. अजय ठाकूर, कोल्हापूर येथील बांबू उत्पादक शेतकरी अमित पाटील, केरळ वन संशोधन संस्था (केएफआरआय माजी प्रमुख शास्त्रज्ञ (वन अनुवंशशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान विभाग) डॉ. ई. एम. मुरलीधरन सहभागी झाले. फाऊंडेशन फॉर एमएसएमई क्लस्टर्स, नवी दिल्लीचे कार्यकारी संचालक मुकेश गुलाटी यांनी पॅनेल चर्चासत्राचे सूत्रसंचालन केले.

मान्यवरांनी बांबू लागवडीचे फायदे नमूद करताना सांगितले की, पडीक व माळरानावर बांबू लागवड अत्यंत फायदेशीर आहे. बांबूची लागवड आर्थिकदृष्ट्या शेतकऱ्यांना सक्षम करणारी आहे. बांबू लागवड पर्यावरणासाठी देखील अत्यंत महत्त्वाची आहे.

बांबू मातीची धूप रोखून तापमानवाढ कमी करण्यास मदत करते. बांबू लागवड जर योग्य मार्गदर्शनातून केली तर शेतकऱ्यांना प्रति हेक्टर अधिक उत्पन्न मिळू शकते. बांबूला ऊसापेक्षा जास्त दर मिळतो आणि उत्पादन देखील चांगले असते.राष्ट्रीय बांबू लागवड अभियानातंर्गत शेतक-यांना बांबू लागवडीसाठी सात लाख रूपये मदत दिली जाते. बांबूचा उपयोग बांधकाम, फर्निचर, कागद निर्मिती, ऊर्जा आणि




हस्तकला अशा अनेक उद्योगांमध्ये होतो.ज्यामुळे त्याची मागणी कायम असते.

बांबूची मुळे जमिनीत घट्ट पकड घेतात, त्यामुळे मातीची धूप रोखली जाते. बांबूची लागवड प्रदेशनिहाय वेगवेगळी करणे गरजेचे आहे.शासनाकडून बांबू लागवडीसाठी उत्कृष्ट दर्जाची रोपे वितरण करणे यासाठी अधिकृत केंद्राची उपलब्धता करुन देण्यात यावी. मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करणार हा व्यवसाय आहे. काही कालावधीनंतर या पिकाची कमी मनुष्यबळात देखरेख करता येते. कोल्हापूरचे बांबू उत्पादक शेतकरी अमित पाटील यांनी १५० एकर डोंगर क्षेत्रात केलेली लागवड आणि त्यापासून मिळालेले फायदे याची माहिती सविस्तर सांगितली. डॉ. ई. एम. मुरलीधरन यांनी बांबू लागवड शास्त्रशुद्ध पद्धतीने करण्यासाठी शेतकऱ्यांनी भर दिला पाहिजे असे सांगितले. डॉ. अजय ठाकूर यांनी बांबू लागवडीसाठी कोणती रोपे प्रदेशनिहाय आवश्यक आहेत, याची माहिती दिली.

# अमेरिकेतील गन संस्कृती

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे विश्वासू सहकारी आणि ट्रम्प यांच्यासाठी निधी गोळा करणारे अमेरिकेतील प्रतिष्ठित नागरिक असलेले चार्ली कर्क यांची अमेरिकेत नुकतीच गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विश्वासू सहकाऱ्याची भर दिवसा रस्त्यांत गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याने जगभर खळबळ माजली. काहींनी याबाबत आश्चर्य व्यक्त केले मात्र अमेरिकेचा इतिहास पाहिला किंवा अगदी अलीकडच्या घटना पहिल्या तरी यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही कारण दिवसाढवळ्या गोळीबार करून हत्या करणे ही नवी गोष्ट नाही. उलट अमेरिकेची ही संस्कृती आहे आणि ती अमेरिकेची गन संस्कृती म्हणून जगभर प्रसिद्ध आहे. आता चार्ली कर्क यांची हत्या झाल्याने आश्चर्य व्यक्त करणाऱ्यांनी मागे वळून पाहिले तर खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांच्यावरही असा जीवघेणा हल्ला करण्यात आला होता ते ही एकदा नव्हे तर दोनदा हे माहीत नसावे. मागील वर्षी अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला असतानाच डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर दोनदा गोळीबार करण्यात आला होता. मागील वर्षीच्या सप्टेंबर महिन्यात ट्रम्प यांच्यावर दुसऱ्यांदा गोळीबार करण्यात आला होता विशेष म्हणजे त्या आधी दोन महिन्यापूर्वीच म्हणजे जुलै मध्येही त्यांच्यावर असाच गोळीबार करण्यात आला होता. दोन महिन्यात डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर दोनदा जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. सुदैवाने दोन्ही वेळा त्यातून ते बचावले. मागील वर्षी १३ जुलै रोजी अमेरिकेतील पेनिसिल्व्हिया राज्यातील एका प्रचार सभेत त्यांच्यावर पहिल्यांदा गोळीबार करण्यात आला. त्यावेळी ट्रम्प यांच्यावर चालवण्यात आलेली गोळी त्यांच्या कानाला चाटून गेली होती. हा हल्ला सभेपासून जवळ असलेल्या छतावरून करण्यात आला. एका वीस वर्षीय तरुणाने त्यांच्यावर हल्ला केला होता. दुसरा हल्ला डोनाल्ड ट्रम्प हे वेस्ट पाम बीच येथील गोल्फ कोर्स वर गोल्फ खेळत असताना त्यांच्यावर करण्यात आला. झुडुपात लपून बसलेल्या रायन रूथ या तरुणाने त्याच्या ए के ४७ या रायफल मधून त्यांच्यावर गोळीबार केला. दैव बलवत्तर म्हणून दोन्हीवेळी त्यांचा जीव वाचला. डोनाल्ड ट्रम्प सारख्या मोठ्या जागतिक नेत्यावर जीवघेणा हल्ला झाल्यानंतर चार्ली कर्क यांच्यावर झालेला हल्ला हा किरकोळ वाटतो. डोनाल्ड ट्रम्प असो की चार्ली कर्क असो यांच्यावर झालेला गोळीबार हे अमेरिकेच्या गन संस्कृतीचे लक्षण आहे. जगासाठी जरी अमेरिकेत होणाऱ्या गोळीबाराच्या घटना खळबळजनक असल्या तरी अमेरिकेसाठी हे काही नवे नाही. याआधीही अमेरिकेच्या काही माजी राष्ट्राध्यक्षांवर असे जीवघेणे हल्ले झाले आहेत. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन, जेम्स गारफील्ड, विल्यम मॅककिनले आणि जॉन एफ केनेडी याची हत्या झाली आहे. त्यांच्यावरही असाच गोळीबार करण्यात आला होता. केवळ राजकीय नेतेच नाही तर जनता देखील या गन संस्कृतीला कायम बळी पडत आली आहे. गन संस्कुतीमुळे अमेरिकेत लाखो नागरिक मरण पावले आहेत. अमेरिकेत गोळीबाराच्या घटनेत मरण पावलेल्या नागरिकांची संख्या ऐकली तर आपल्याला धस्स होईल कारण अमेरिकेत गोळीबाराच्या घटनांमध्ये मागील पन्नास वर्षात १४ लाख लोकांना जीव गमवावा लागला आहे. अमेरिकेत गोळीबाराच्या घटनेत दररोज सरासरी १०० लोक मरण पावतात. ही आकडेवारी थक्क करणारी आहे. कारण जागतिक महासत्ता असलेल्या देशात अशा प्रकारे लोकांचा जीव जात असेल तर ते धक्कादायकच नाही तर चिंताजनक देखील आहे. अमेरिकेत शाळेत गोळीबार झाल्याचा आणि त्यात अनेक शाळकरी मुलांचा मृत्यू झाल्याच्या बातम्या आपण नेहमीच ऐकतो, वाचतो अर्थात याला अमेरिकाच जबाबदार आहे. अमेरिकेत पूर्वीपासून गन संस्कृती अस्तित्वात आहे. दुकानातून फळे, भाजीपाला मिळतात तशा तिथे बंदुका विकत मिळतात. बंदुका चालवण्यासाठी किंवा विकत घेण्यासाठी आपल्याकडे जसा शासकीय परवाना काढावा लागतो तसा तिथे काढावा लागत नाही. तिथे बंदुका आणि काडतूस सहज मिळतात म्हणूनच तिथे गन संस्कृती उदयास आली. आता हीच गन संस्कुती अमेरिकेच्या मुळाशी आली आहे. अमेरिकेच्या या गन संस्कृतीवर अनेकांनी चिंता देखील व्यक्त केली आहे पण अमेरिकेच्या नेत्यांनी ती कधीही गांभीर्याने घेतली नाही. खुद्द डोनाल्ड ट्रम्प हे गन संस्कृतीचे मोठे समर्थक आहेत. २०१६ मध्ये त्यांनी दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी रिव्हॉल्वर व रायफल हे स्वसंरक्षणासाठी एक उत्तम शस्त्र असल्याचे म्हंटले होते. केवळ ट्रम्पच नाही तर अमेरिकेतील अनेक नेते हे गन संस्कृतीचे समर्थक आहेत. आता मात्र हीच संस्कुती त्यांच्या जीवावर उठली आहे.

# नवरात्र उत्सव;नवचैतन्याचा उज्ज्वल प्रकाश

माँदेवी हे मांगल्य, चैतन्य, उर्जेचे व शक्तीचे प्रतीक आहे. अनेक कठीण प्रसंगी देवीची आराधना केली जाते.कारण माँ दुर्गे चे दुसरे रूप म्हणजे संपूर्ण ब्रम्हांडच म्हणावे लागेल. घटस्थापणेपासुन तर दसऱ्यापर्यंत संपूर्ण भारतात आपल्याला वेगवेगळ्या पध्दतीचे उत्सहाचे व मांगल्याचे वातावरण पहायला मिळते.माँ दुर्गाची शक्ती अफाट व अनंतकाल आहे. त्याची आपण गणना सुध्दा करू शकत नाही.त्यामुळे संपूर्ण शुभ कार्याप्रसंगी व कठीण प्रसंगी देवीची आराधना केली जाते.देवीचे अनेक रूप आपल्याला पहायला मिळते.प्राचीन काळापासून शक्तीच्या उपासनेला खूपच महत्व दिले आहे. शक्तीची उपासना मानवजातीच्या कल्याणासाठी नेहमी प्रेरणादायी ठरत असते.नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने आपल्याला वेगवेगळी शक्तीची रूपे पहायला मिळते. म्हणजे नवरात्रीमध्ये पृथ्वीतलावर साक्षात देवी प्रगट होत असते.या पृथ्वीतलावर देवी भागवत पुराणानुसार देवींची १०८ शक्तीपीठ असल्याचे सांगण्यात येते.त्याचप्रमाणे वेगवेगळ्या पुराणांमध्ये ही आकडेवारी वेगवेगळी सांगीतली आहे.कालिका पुराणांमध्ये २६ ,शिवचरित्र पुराणामध्ये ५१,दुर्गा शप्तसती आणि तंत्रचूडामणिमध्ये शक्ती पीठांची संख्या ५२ सांगितली आहे. परंतु साधारणत: ५२ शक्तीपीठांना जास्त महत्व दिले जाते.या शक्ती पीठांपैकी साडेतीन शक्तिपीठे एकट्या महाराष्ट्रात आहे हे महाराष्ट्राचे अहोभाग्यच म्हणावे लागेल.देवीची साडेतीन शक्तिपीठामध्ये श्री महालक्ष्मी(अंबाबाईचे देऊळ,कोल्हापूर) हे महाराष्ट्रात असलेल्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक आहे.श्री रेणुकामाता (माहूर) माहूर हे देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी दुसरे असून येथील पीठाची देवता रेणुकामाता आहे.रेणुकादेवी तसेच दत्तात्रय आणि परशुराम यांची देखील प्राचीन मंदिरे माहूरगडावर पहायला मिळते. त्यामुळे साडेतीन शक्तिपीठांपैकी हे एक मूळ जागृत पीठ आहे. तुळजाभवानी (तुळजापूर) महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी तिसरे शक्तीपीठ आहे. श्री तुळजाभवानी देवीचे तुळजापूर क्षेत्र हे एक पूर्ण शक्तिपीठ आहे.ही देवी भगवती (भवानी) म्हणून प्रसिध्द आहे. महाराष्ट्रातील प्रेरणा शक्ती व स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची आराध्य दैवत अशी ही तुळजापूरची तुळजाभवानी देवी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आहे.इतिहास व पुरातत्वदृष्ट्या हे मंदिर यादवकालीन मानले जाते.तर काहिंच्या मते हे १७ व्या किंवा १८ व्या शतकातील मानली जाते.व साडेतीन शक्तिपीठांपैकी अर्ध्या पीठाचे महत्त्वाचे स्थान म्हणजे सप्तशृंगी देवी (नाशिक) सप्तशृंगीदेवीला महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वतीचे ओंकार रूप समजण्यात येते. शुंभनिशुंभ व महिशासुर या पाशवी शक्तीच्या असुरांचा नाश केल्यावर तप-साधनेसाठी देवीने या गडावर वास्तव्य केले होते. सह्यांद्रीच्या या उंच कड्यास सात शिखरे आहेत. त्यावरूनच या स्थानाचे नाव सप्तशृंगगड असे पडले.नवरात्र उत्सवामध्ये संपूर्ण भारतात आपल्याला एक वेगळेच मांगल्याचे व नवचैतन्याचे वातावरण पहायला मिळते. कारण लहान-मोठे, आबालवृद्ध संपूर्ण मॉदेवीच्या आराधनेमध्ये तल्लीन असतात व जय माता दी चा जयघोष करीत असतात.त्यामुळे नवरात्रीपासुनच दिवाळीच्या सणाची चाहूल लागते आणि नवरात्रीपासुनच आपण घरांच्या सजावटीला सुरूवात करतो. नवरात्र उत्सवामध्ये देवीची ९ दिवस आराधना केल्यानंतर दशमीला विजयादशमी (दसरा)उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो.या दिवसाचे महत्त्व म्हणजे असुरी शक्तीचा नाश व सत्याचा विजय मानलेल्या जाते.दशमीला प्रभुरामचंद्राने रावणाचा संहार करून असुरी शक्तीला संपवीले व विजय प्राप्त केली. त्यानिमित्यानेच विजयादशमी उत्सव साजरा केला जातो. आपण पहातो की नवरात्रीपासुन गुलाबी थंडीला सुरुवात होते. म्हणजे संपूर्ण सृष्टीचे वातावरण या ९ दिवसांमध्ये बदलल्याचे आपल्याला दिसून येते व सर्वत्र नवचैतन्य निर्माण होते. महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधल्या जाते.त्याचप्रमाणे महाराष्ट्रात अनेक देवीदेवतांचे वास्तव्य असल्याचे आपल्याला पहायला मिळते. त्यामुळे महाराष्ट्रातील संपूर्ण नागरिकांनी महाराष्ट्र दर्शन करून देवीदेवतांचे एकदा तरी दर्शन घेतले पाहिजे.नवरात्रामध्ये आपण मॉदेवीची आराधना करतोच यात दुमत नाही.परंतु निसर्गाला वाचविण्यासाठी देवीला साकडे सुध्दा घातले पाहिजे. कारण दिवसेंदिवस निसर्गाचे संतुलन डगमगल्याने हवामानात मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. यामुळे पशुपक्षी,मानव, जीवजंतू यांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे स्पष्ट दिसुन येते.कारण वाढते प्रदुषण, जंगल तोड यामुळे निसर्ग भयभीत झालेला आहे.याचेच प्रयचित्य पशुपक्षांना भोगावे लागत आहे. आज जंगल तोडीमुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे अनेक पशुपक्षी नामशेष झाल्याचे दिसून येते. उदाहरण द्यायचे झाले तर चित्ता असे अनेक पशुपक्षी आहेत की ते काही नामशेष झाले आहेत किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.याकरिता नवरात्र उत्सव लक्षात घेता संपूर्ण भक्तांनी वृक्षलागवडीकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.फक्त फोटो शेषन पुरते वृक्षारोपण नसावे तर ९ दिवस वृक्षलागवडीची मोहीम युध्दपातळीवर राबवीली पाहिजे.यात सरकारचा, प्रशासनाचा, सामाजिक संस्थांचा, दुर्गा मंडळे, यांचा सुध्दा सहभाग असायला हवा.यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईलच मॉदेवी सुध्दा प्रसन्न होईल व आपणा सर्वांना भरपूर आर्शिवाद देईल.कारण वृक्षलागवडीमुळे स्थल, जल, वायु यांचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल.मॉ महालक्ष्मी, रेणुकामाता, तुळजाभवानी, सप्तशृंगी देवीला प्रार्थणा करतो की नवरात्रामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होवो आकार- पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर -दक्षिण सर्वत्र सुखशांती व मांगल्याचे वातावरण निर्माण झाले पाहिजे अशी देवीच्या चरणी प्रार्थना करतो.कारण नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होने काळाची गरज आहे.कारण वाढते प्रदुषण, जंगलतोड व दिवसेंदिवस ऑक्सिजनची मात्रा कमी होने.यामुळे मानव, पशुपक्षी, जीवजंतू व अन्य प्राणी यांचा सर्वांचा जीव धोक्यात आहे.याकरीता नवरात्र उत्सवाच्या पावनपर्वाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून संपूर्ण भारतवासीयांनी इतिहास घडवीने गरजेचे आहे.कारण मॉदेवी म्हणजे संपूर्ण ब्रम्हांड त्यामुळे आपल्याला वृक्षांच्या जळामुळात, पानात,फुलात,फळात आपल्याला देवीचे अवश्य दर्शन अवश्य होईल. सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके!! शरण्ये त्र्यम्बके गौरी नारायणी नमोस्तुते!!

!! जय माता दी!!

**लेखक,रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**

# घटस्थापना व नवरात्रोत्सव : श्रद्धेचा दीप आणि स्त्रीशक्तीचा जागर

भारताचा प्रत्येक सण हा केवळ आनंदाचा क्षण नसतो, तर तो आपल्याला जीवन जगण्याची नवी दिशा देतो. नवरात्रोत्सव हा त्यापैकीच एक महत्त्वाचा उत्सव. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून घटस्थापनेने या उत्सवाची सुरुवात होते. त्या क्षणी प्रत्येक घरात, प्रत्येक अंतःकरणात एक नवी उर्जा, एक नवा प्रकाश जागतो. घटस्थापना हा हिंदू धर्मातील एक विधी आहे. आश्विन शुद्ध प्रतिपदा या तिथीला स्वरूप घडा किंवा कलश याच्या ठिकाणी देवीची स्थापना केली जाते आणि याचे नऊ दिवस पूजन केले जाते. ताटात गंगाजलाने भरलेला कलश ठेवून आणि त्यात नाणी, सुपारी आणि कच्चा तांदूळ आणि हळद पावडर पासून तयार केलेले अक्षत भरतात. त्यावर आंब्याची पाच पाने आणि एक नारळ घालतात. शेवटी माँ शैलपुत्री आणि माँ दुर्गा यांची पूजा करतात आणि तेलाचा दिवा, अगरबत्ती, फुले, फळे, मिठाई आणि देशी तुपाचा विशेष भोग लावतात. तसेच आश्विन महिन्यात घटामध्ये देवीची स्थापना करून, नंदादीप प्रज्वलित करून आदिमायेची नऊ दिवस मनोभावे पूजा करणे, म्हणजेच घटस्थापना किंवा नवरात्रोत्सव. घटस्थापना दरम्यान लोक कलशात पवित्र पाणी भरतात. त्यानंतर कलशावर शेणाचा लेप केला जातो आणि त्यात बार्लीच्या बिया पेरल्या जातात. नंतर ते वाळूच्या खड्ड्यात ठेवले जाते. कलश हिंदू विधींमध्ये खोल प्रतीकात्मकता धारण करतो, विपुलता, समृद्धी आणि आध्यात्मिक शुद्धतेचे प्रतिनिधित्व करतो. हे पवित्र गंगा नदीच्या पाण्याने भरलेले आहे, जे जीवन टिकवून ठेवणाऱ्या दैवी उर्जेचे प्रतीक आहे. कलश हे दैवी पात्र म्हणून पूजनीय आहे आणि समारंभांमध्ये तांदळाच्या पलंगावर ठेवले जाते.

जेव्हा आपण मातीत बी पेरतो, तेव्हा ती छोटीशी हिरवी कोंब दिसण्यासाठी आपल्या डोळ्यांत किती प्रेम असतं! घटस्थापनेतले हे धान्य फक्त अन्नधान्याचे प्रतीक नसते, तर जीवनातील नव्या उमेदिचे, नव्या स्वप्नांचे आणि नव्या विश्वासाचे प्रतीक असते. कलशातील पाणी आपल्याला सांगते जीवन सतत वाहतं, अडथळे आले तरी थांबत नाही. आणि नारळ आपल्याला आठवण करून देतो कणखर आवरणातही गोडवा दडलेला असतो. नवरात्रीत आपण देवीच्या नऊ रूपांची पूजा करतो. परंतु ती देवी केवळ आकाशातील एखादी मूर्ती नसते, ती आपल्याजवळच असते-आपली आई, बहीण, पत्नी, मुलगी, शिक्षिका, कामगार स्त्री. तिच्या त्यागातून, तिच्या कष्टातून आणि तिच्या प्रेमातूनच खऱ्या शक्तीचा उगम होतो. घटस्थापना आपल्याला शिकवते की ज्या हातांनी संसार उभा राहतो, ज्या हृदयाने संसार सांभाळला जातो, त्याच हातांना, त्याच हृदयाला आपण वंदन करायला हवे.

नवरात्रीच्या रात्री गावोगावी होणारे जागर, भजनी मंडळींचे सूर, दांडियागरब्याची तालबद्ध पावलं-हे सगळं एकच सांगतं, की माणूस एकटा आनंद शोधू शकत नाही. आनंद तेव्हाच खरा जेव्हा तो सामायिक केला जातो. देवीसमोर बसून केलेली सामूहिक आरती, सगळ्यांच्या डोळ्यांत चमकणारी श्रद्धा-हीच खरी एकात्मतेची मूर्ती आहे. आज समाजात तणाव, भेदभाव, हिंसा वाढत चालली आहे. अशावेळी घटस्थापनेतून मिळणारा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो जसे धान्य मातीमध्ये पेरले की अंकुर फुटतो, तसेच प्रेम पेरले तर समाजात सौहार्द अंकुरतो. नवरात्रोत्सवाने आपण केवळ देवीची पूजा न करता, प्रत्येक स्त्रीला सन्मान द्यावा, प्रत्येक दुर्बलाला आधार द्यावा, हेच या सणाचे खरे पालन आहे.

नवरात्रीचे उत्सव संपूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळे असतात आणि विशिष्ट संस्कार क्षेत्रांमध्ये भिन्न असतात, जरी त्यांना समान म्हटले जाते आणि एकाच देवतेला समर्पित केले जाते. सर्वात सामान्य उत्सव नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घटस्थापनेने सुरू होतो, ज्याचा शाब्दिक अर्थ भांडगे चढवणे असा होतो. घटस्थापना पूजेचे महत्त्व आणि महत्त्व हे जीवनाच्या सर्व क्षेत्रात देवीचे सामर्थ्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करते. या व्यतिरिक्त हा चांगला आणि वाईट यांच्यातील लढाईच्या प्रारंभाचा उत्सव आहे. संपूर्ण सणात कलशाची पूजा केली जाते त्यानंतर दहाव्या दिवशी किंवा विजयादशमीला कलश विसर्जन केले जाते.

महाराष्ट्रात नवरात्रीची ही पोकळी भरून काढण्यासाठी, प्रबोधनकार, बोले आणि इतरांनी नवरात्र हा जनसामान्यांचा उत्सव म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली, प्रबोधनकारांनी शिवाजी महाराजांनी पूजलेल्या तुळजापूरच्या भवानीला महाराष्ट्राचे प्रमुख दैवत म्हणून धारण केले. हिंदूंना जातीपातीच्या ओलांडून एकत्र आणण्याची कल्पना होती. त्यांच्या चरित्रात, प्रबोधनकार असा दावा करतात की, शिवाजी महाराजांच्या काळात जरी नवरात्र साजरी केली जात असली तरी पुण्यातील ब्राह्मण पेशव्यांच्या काळात गणेशपूजेला प्राधान्य मिळाले. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी नंतर सार्वजनिक उत्सवाच्या माध्यमातून गणेश उपासना परंपरेचे पुनरुज्जीवन केले. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्हा हा नवरात्रोत्सवासाठी प्रसिद्ध आहे. उत्सवादरम्यान शहर दिव्यांनी सजवले जाते आणि अनेक सांस्कृतिक कार्यक्रम होतात.

नवरात्र हे साधारणपणे नऊ दिवसांचे असते पण तिथीचा क्षय झाल्याने ती आठ दिवसांची किंवा वृद्धी झाल्यास दहा दिवसांची असू शकते. चंपाषष्ठीची म्हणजे खंडोबाची नवरात्र फक्त सहा दिवसांचे असते. सर्व देवांच्या ठिकाणी असलेल्या शक्तींचे दैवतीकरण होऊन त्या शक्तिरूप मूर्तीला देवी असे नाव मिळाले आणि शाक्त संप्रदायी लोकांनी तिला सर्वश्रेष्ठ देवता, आदिमाया किंवा जगदंबा म्हणून गौरविले. देवीची उग्र व सौम्य अशी दोन रूपे पहायला मिळतात. उमा, गौरी, पार्वती, जगदंबा, भवानी ही देवीच्या सौम्य रूपांची नावे असून दुर्गा, काली, चंडी, भैरवी, चामुंडा ही देवीची उग्र रूपे आहेत. शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडी, कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी आणि सिद्धिदात्री अशी ही देवीची नऊ रूपे आहेत. मार्कंडेय पुराणातील देवी माहात्म्यात सांगितले आहे शरद ऋतूतील वार्षिक महापूजेत देवीमाहात्म्य भक्तिपूर्वक ऐकल्यास सर्व बंधनांपासून व्यक्ती मुक्त होते आणि धनधान्याने परिपूर्ण होते.

नवरात्र हा ऋतू परिवर्तनाचा काल असतो. यामुळे आपल्या नवीन शक्ती, नवा उत्साह, उमेद निर्माण होत असते. बृहत संहितेनुसार सूर्य तसेच इतर ग्रहांमध्ये होणाऱ्या परिवर्तनाचा प्रभाव मनुष्याच्या आरोग्यावर आणि व्यवहारांवर होत असतो. सृष्टीतील परिवर्तन हा शक्तीचाच खेळ आहे. ब्रह्मचर्य, संयम, उपासना, यज्ञ केल्याने शरीरात रोगप्रतिकारक शक्ती वाढते. स्मरणशक्ती चांगली होऊन बौद्धिक विकास होतो. म्हणून नवरात्र हा शारीरिक व आत्मिक शुद्धतेचा काळ आहे असे मानले जाते. गुजरातमध्ये नवरात्री उत्सव उत्साहाने साजरा केला जातो. दांडिया किंवा दांडिया रास हे गुजरातमधील लोकनृत्य आहे. हे समूहनृत्य विशेष करून नवरात्रात नाचले जाते. गुजरातमध्ये कोणत्याही सणाला किंवा शुभप्रसंगी हे नृत्य करण्याची परंपरा आहे. गरबा हा गुजरातमधील नवरात्री उत्सवातील पारंपरिक नृत्याचा प्रकार आहे. एका रंगीत घड्याला छिद्रे पाडून त्यात दिवा लावला जातो आणि त्याची पूजा केली जाते. या घड्याला गरबो असे म्हणतात.

गरबा खेळणे म्हणजे टाळयांच्या किंवा बहुधा लाकडी दांड्यांच्या लयबद्ध गजरामध्ये देवीची भक्तिरसपूर्ण गाणी म्हणणे. गरब्याच्या वेळी गोलाकार फेर धरून केलेले मंडल हे घटाचे प्रतीक असते, यांच्या मध्यभागी छिद्र असलेल्या रंगीबेरंगी मातीच्या घड्यात दिवे लावले जातात आणि त्याभोवती गोलाकार नाचण्याची पद्धत आहे. नवरात्र साधारणपणे देवीचे असते, पण इतर देवांची नवरात्रेही असतात. तुळजाभवानीचे नवरात्र दहा दिवसांचे असते, तशीच खंडोबाचे, व्यंकटेशाचे, नरसिंहाचे, दत्ताचे अशी इतरही नवरात्रे असतात. यापैकी नरसिंहाचे नवरात्र तीन ते नऊ दिवस, खंडोबाचे पाच किंवा सहा दिवस, बालाजी (व्यंकटेशाचे) दहा दिवस, दत्ताचे नऊ ते दहा दिवस असते. आश्विन शुक्ल प्रतिपदेपासून सुरू होणाऱ्या नवरात्रीं खेरीज, आश्विन शुक्ल तृतीयेपासून सुरू होणारा सप्तरात्रोत्सव, पंचमीपासून सुरू होणारा पंचरात्रोत्सव आणि सप्तमीपासून सुरू होणारा त्रिरात्रोत्सव ही कमी-अधिक दिवसांची नवरात्रे असतात.

नवरात्री दरम्यान विशिष्ट रंग परिधान करणे शुभ मानले जाते, कारण प्रत्येक दिवसाचा एक वेगळा दुवा आणि महत्त्वपूर्ण आध्यात्मिक अर्थ आहे. नवरात्रीचा पहिला रंग हा उत्सव सुरू होणाऱ्या आठवड्याच्या दिवसानुसार निवडला जातो आणि उरलेले आठ दिवस पूर्वनिश्चित चक्रानुसार रंगवले जातात. नवरात्रीचे नऊ रंग पिवळे, हिरवे, राखाडी, केशरी, पांढरे, लाल, रॉयल ब्लू, गुलाबी आणि जांभळे आहेत. या रंगांचा उपयोग उत्सवादरम्यान पूजा केल्या जाणाऱ्या प्रत्येक देवींचे चित्रण करण्यासाठी केला जातो.

सोमवार: पांढरा - स्वतःला पांढरी फुले आणि इतर वस्तूंनी वेढून घ्या. मंगळवार: लाल - तुमच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडण्यासाठी आव्हाने स्वीकारा. बुधवार: तुमची प्रलंबित कामे अभ्यासण्यासाठी आणि पूर्ण करण्यासाठी हिरवा दिवस चांगला आहे. गुरुवार: पिवळा - शैक्षणिक उत्कृष्टतेचा पाठपुरावा करण्यासाठी उत्कृष्ट दिवस.

घटस्थापना ही फक्त एका कलशाची स्थापना नाही, तर ती आपल्या अंतःकरणात श्रद्धेचा दीप प्रज्वलित करण्याची प्रक्रिया आहे. नवरात्रोत्सव हा फक्त नऊ दिवसांचा उत्सव नाही, तो जीवनभर जपण्याजोगा संस्कार आहे. शक्तीची उपासना करून जर आपण स्त्रीला खरा मान, समाजाला खरी एकात्मता आणि निसर्गाला खरी जपणूक दिली, तर हाच उत्सव आपल्या जीवनाला खरं यश देईल. घटस्थापना आणि शारदीय नवरात्री तुमच्या आयुष्यात सुख, समृद्धी, शांती घेवून येवो, हीच सदिच्छा व घटस्थापना व नवरात्रोत्सवाच्या मंगल पर्वाच्या हार्दिक शुभेच्छा !

**-प्रविण बागडे**
**नागपूर**

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज / प्रतिनिधी** / केज तालुक्यातील मौजे साबला येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने सय्यद बाशा पीर साहेब दर्गा याठिकाणी माननीय विठ्ठलराव नागरगोजे - गटविकास अधिकारी , पंचायत समिती , केज . यांच्या शुभ हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षा सरपंच जनाबाई नरहरी काकडे साबला . प्रमुख पाहुणे माननीय अनिलराव चौरे - विस्तार अधिकारी , पंचायत समिती , केज. माननीय विजयकुमार मस्के - विस्तार अधिकारी , पंचायत समिती , केज . उपसरपंच कचराबाई राजेंद्र सरवदे साबला .माननीय तानाजी शिंपले - ग्रामपंचायत अधिकारी साबला , माननीय मधुकरराव काकडे माजी सरपंच साबला . माननीय मोहजेब इनामदार , मुंबई . माननीय महादेवराव कटारे माजी सरपंच साबला .माननीय हनुमंतराव नाईकनवरे माजी सरपंच साबला . माननीय राहुलराव सरवदे रिपाई ( आठवले गट ) जिल्हा उपाध्यक्ष , बीड . माननीय वली तांबोळी प्रकल्प समन्वयक एआरटी संस्था , यवतमाळ . श्रीमती ज्योती सांबरे प्रकल्प सहाय्यक एआरटी संस्था , यवतमाळ . वरील सर्व मान्यवरांच्या हस्ते तसेच साबला नगरीतील नागरिकांच्या उपस्थितीत वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली .

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माननीय विठ्ठलराव नागरगोजे - गटविकास अधिकारी , पंचायत समिती , केज . यांनी मार्गदर्शन करत असताना , आपल्या जीवनात वृक्षांचं महत्व काय आहे. तर सावली गार मिळते , स्वच्छ हवा मिळते . वृक्ष लागवड करणे ही सध्या काळाची गरज आहे . तसेच त्यांचे संगोपन ही केले पाहिजे .

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान या अभियानात आपला सहभाग नोंदवावा . त्याच्या



माध्यमातून गावातील स्वच्छतेचे . महत्व त्यांनी साबला नगरीतील नागरिकांना समजावून सांगितले . ओला कचरा गोळा करून वेगळा ठेवणे . व सुका कचरा गोळा करून वेगळा ठेवणे . तसेच प्लास्टिकच्या कॅरी बॅग ईतर कुठेही टाकू नये . म्हणजे याच्या पासून डास होणार नाहीत . घाण वास येणार नाही .जशी आपण आपल्या आरोग्याची घेतो .


तशी आपण गावातील नागरिकांच्या आरोग्याची सुध्दा घेतली पाहिजे . गावातील सांडपाण्यासाठी शोष खड्डा तयार करणे .त्या पाण्याचा जमिनीत निचरा करणे . आपल्या घराच्या जवळपास घाण न होऊ देणे . अशाप्रकारची कामे करण्यासाठी गावातील सर्व नागरिकांनी सहभाग नोंदवावा . गावात आरोग्य केंद्र असावे , गावातील तरुण युवकांना तसेच वयोवृद्ध नागरिकांना व्यायाम करण्साठी मोकळे मैदान असावे . गावातील शाळा , अंगणवाडी , यांच्या इमारती मजबूत असायला पाहिजेत .

या कार्यक्रमासाठी महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते . त्यामध्ये नजीर काझी यांनी स्वतः च्या खर्चाने काही वृक्षांची रोपे घेवून दिली आहेत . उपस्थित ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , पोपट काकडे , तसेच गणेश कटारे , महादेव काकडे , बालाजी काकडे , दत्तकुमार काकडे , जालिंदर मुळे , संदिपान काकडे , अक्षय काकडे , गुलाबराव मुळे , विश्वनाथ नाईकनवरे , लखन राऊत , बाबासाहेब नाकईनवरे , गणेश काकडे गणेश सरवदे , संतराम सरवदे यावेळी गावातील इत्यादी नागरिक उपस्थित होते . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण तात्या काकडे यांनी तर प्रास्ताविक आदर्श शिक्षक नरहरी काकडे तर आभार प्रदर्शन विजयकुमार शिंदे केले .

# हनुमंत चौरे शिक्षक यांची बदली झालेने त्यांना निरोप देण्यात आला

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज /प्रतिनिधी** /केज तालुक्याती जीवाची वाडी येथील जि.प.प्रा.शाळा एडका वस्ती या शाळेतून आज त्यांची बदली झाली असून त्यांनी दि १ जुलै २००४ ते आज दि. १८ सप्टेंबर २०२५ पर्यंत म्हणजे २०-२१ वर्ष या जिल्हा परिषद शाळा एडकावस्ती येथे शैक्षणिक कार्य केले, त्यांनी गावातील एक नागरिक सोडून शिक्षक कसा असावा.हे त्यांच्या शिक्षक वृतीतून अनेक वेळी आम्ही अनूभवले आहे.असे शिक्षक प्रत्येक शाळेवर असावेत म्हणजे शिक्षण क्षेत्रातील दर्जा उंचावेल आणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रात आवड निर्माण होईल व विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी योग्य पाया उभारलेला दिसेलआज हनुमंत चौरे सर यांच्या निरोप समारंभ नाही तर दु:ख म्हणावे लागेल.



क ा र ण शिक्षक काय असतो हे त्यांनी विद्यार्थ्यांना नाही तर तेथील नागरीकांना देखिल त्याची जाणीव करून दिली आज आम्ही चांगल्या शिक्षकाला निरोप देतोय हे दुःख आहे पण त्यांनी केलेली कामगिरी हि अतुलनीय आहे.हनुमंत चौरे सर तुम्ही आमच्या मुलांना दिलेली शिक्षण रुपी विद्या त्याबद्दल आम्ही तुमचे ऋणी आहोत.आपले कार्य सदैव विस्मरणीय राहील असे भावनीक उरद्गार एडकावस्ती वरील पालकांनी केले.

# वेरूळ हे विश्वकर्मा वंशीयांचे शक्तिपीठ-प्रा.नागोजीराव पांचाळ



**आत्ताच एणक्सप्रेस**

**खुलताबाद /प्रतिनिधी** / खुलताबाद तालुक्यातील श्री क्षेत्र वेरूळ येथे हे विश्वकर्मा वंशीय समाज बांधवांचे शक्तिपीठ आहे म्हणूनच दर्शवर्षी १७ सप्टेंबर रोजी महाराष्ट्रातील तमाम सुतार, लोहार, सोनार,तांबट, शिल्पकार,जांगिड व पांचाळ समाज बांधव इथे मोठ्या संख्येने एकत्र येतात प्रभू भगवान श्री विश्वकर्मांच्या चरणी लीन होतात. आणि मोठी ऊर्जा घेऊन जातात, असे प्रतिपादन विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.नागोजीराव पांचाळ यांनी केले. विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेच्या वतीने बुधवार दिनांक १७ सप्टेंबर रोजी श्री क्षेत्र वेरूळ येथील प्रभू श्री विश्वकर्मा मंदिरात आयोजित विश्वकर्मा पूजन दिन व विश्वकर्मा वंशीय समाज बांधवांच्या राज्यव्यापी महा मेळाव्यात अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते.गुरुवर्य महंत महेंद्र बापूजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या मेळाव्यास गंगापूरचे आ.प्रशांत बंब,छत्रपती संभाजीनगर येथील विधानपरिषदेचे आ. संजय केणेकर, मनमाडचे मा. आ. राजेंद्र देशमुख, नियोजन समितीचे अध्यक्ष राजेश नागपुरे,

कार्याध्यक्ष अरुण भालेकर, सचिन सुतार, प्रसिद्धी प्रमुख भगवान राऊत,सचिव विलास पवार,कोषाध्यक्ष गणेश गव्हाणे, उपाध्यक्ष गोपाल राऊत,धनराज वेलणकर,संजय शहाणे, शिवानंद थोरकर, रोहिदास जांगिड, उद्योजक तानाजी शेटे, महिला कार्याध्यक्ष शुभदा धामापूरकर, कोकण विभागीय अध्यक्ष रामचंद्र मिस्त्री, पराग अहिरे, सुनीता भालेराव आदी मान्यवर विचारपीठावर उपस्थित होते.यावेळी बोलतांना प्रा.नागोजीराव पांचाळ म्हणाले की, इथून पुढच्या काळात समाजाच्या दशा आणि दिशा काय असेल आणि त्यासाठी काय कृती कार्यक्रम राबवावा लागेल या बाबत संघटनेने गांभीर्यपूर्वक विचार करून भविष्य काळातील ध्येय धोरणे व दिशा ठरवली आहेत. त्यानुसार आपण मार्गक्रमण करणे क्रमप्राप्त आहे. न्यायमूर्ती रोहिणी आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी झाली पाहिजे कारण न्या. रोहिणी आयोज म्हणजे मायक्रो ओबीसींच्या संरक्षणाची ढाल आहे. नवीन पिढीने इथून पुढे उच्च शिक्षणातील नवीन वाटा व नवनवीन क्षेत्र निवडले पाहिजे.

त्याच बरोबर आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती,नगरपरिषद, महानगर पालिका या स्थानिक संस्थांच्या निवडणुका समाज बांधवांनी लढविल्या पाहिजे असेही ते म्हणाले.यावेळी आ. प्रशांत बंब, आ. संजय केणेकर, गुरुवर्य महंत महेंद्र बापू, अरुण भालेकर,पराग अहिरे यांचीही भाषणे झाली. राजेश नागपुरे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना, संघटनेची ध्येय धोरणे व दिशा याबाबत सविस्तर विवेचन केले. सुदाम नलावडे यांनी युवकांना उद्योगाविषयी मार्गदर्शन केले तर विजय सुरासे यांनी स्पर्धा परीक्षां बाबत मार्गदर्शन केले.

सकाळी प्रभू विश्वकर्मा मंदिरात गुरुवर्य महंत महेंद्र बापू यांच्या प्रमुख उपस्थितीत पूजा, अभिषेक, व होम, हवन झाले.त्यानंतर लोकमाता अहिल्यादेवी होळकर जल कुंडा पासून प्रभू विश्वकर्मां च्या प्रतिमेची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली होती.या मिरवणुकीत समाज बांधव व भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विजय पांचाळ व भगवान राऊत यांनी सूत्रसंचालन केले. सचिन सुतार व अरुण भालेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अमोल डोळस,चंदू हिवाळे, परमेश्वर पांचाळ, राजकुमार राऊत, प्रसाद गडकर, भाऊसाहेब राऊत, विलास पवार, संजय सुतार, विनायक सुतार, रामचंद्र मिस्त्री, सर्जेराव कळसकर,बालाजी पांचाळ, अरुण वाघमारे,गोपाल राऊत, व्यंकट पांचाळ, पूजा भालेकर, अनिता राऊत यांनी परिश्रम घेतले.

## मुख्याधिकारी भागवत बिघोत यांनी मॅरेथॉन स्पर्धा गाजवली




**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर/ सुयोग वाणी** / वैजापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक भागवत बिघोत यांनी लद्दाख मॅरेथॉन स्पर्धा चांगलीच गाजवली. २२ किलोमीटर अंतर अवघ्या २ तास २ मिनिटात पूर्ण करत पारितोषिक पटकावून वैजापूर शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. जगभरातील १२०० खेळाडू या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झाले होते.बारा हजार फूट उंची, कमी ऑक्सिजन,कधी कडक उन तर कधी थंड हवा अश्या वातावरणात बिघोत यांनी हा यशाचा शिखर सर केला आहे. वैजापूरसह महाराष्ट्राचे नाव उज्वल करत त्यांनी या स्पर्धेच्या माध्यमातून जगाच्या नकाशावर आणले आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

या विजयाबद्दल जिल्हा बँकेचे संचालक डॉ. दिनेश परदेशी मा.नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, साबेर खान, युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस विशाल संचेती,भाजप जिल्हा उपाध्यक्ष दिनेश राजपूत, विनोद राजपूत, शैलेश पोंदे, पत्रकार सुयोग वाणी, फैसल पटेल यांच्यासह शहरातील अनेक मान्यवरांनी व नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## रा. स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक मधुभाई कुलकर्णी यांचे निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक आदरणीय मधुभाई (माधव विनायक) कुलकर्णी (वय ८८) यांचे आज दुपारी १२.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथे निधन झाले. १५ मे १९३८ मध्ये कोल्हापूर येथे जन्मलेल्या मधुभाईंचे शालेय शिक्षण चिकोडी, जिल्हा बेळगाव (कर्नाटक) येथे झाले. १९५४ मध्ये कोल्हापूर विद्यापीठ हायस्कूलमधून त्यांनी मॅट्रिक पूर्ण केली. पुढे १९५८ मध्ये रुपारेल कॉलेज, मुंबई येथून बी.ए. पदवी प्राप्त केली. काही काळ त्यांनी मुंबई सेल्स टॅक्स खात्यात नोकरी केली. त्यानंतर १९६०-६१ मध्ये सोलापूरच्या दयानंद शैक्षणिक महाविद्यालयातून बी.एड. पूर्ण केले.



शालेय जीवनापासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मधुभाई जोडले गेले होते. १९६२ मध्ये ते संघाचे प्रचारक म्हणून कार्यरत झाले. तालुका प्रचारक, जिल्हा प्रचारक, विभाग प्रचारक, पुणे महानगर प्रचारक, गुजरात प्रांत प्रचारक, पश्चिम क्षेत्र प्रचारक, अखिल भारतीय बौद्धिक प्रमुख (केद्र, भाग्यनगर) अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे सांभाळल्या. २०१५ पर्यंत ते संघाच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य होते. त्यानंतर दायित्वमुक्त ज्येष्ठ प्रचारक म्हणून ते संभाजीनगर येथे कार्यरत राहिले.

त्यांच्या काळात पुण्यात तळजाई येथे महाराष्ट्राचे भव्य शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले. तरुण स्वयंसेवकांसाठी त्यांनी लिहिलेले अथातो संघजिज्ञासा हे पुस्तक अनेक भाषांमध्ये अनुवादित झाले आहे. अखेरच्या क्षणापर्यंत शाखा, प्रवास, संवाद यात त्यांचा सक्रिय सहभाग कायम राहिला. त्यांच्या निधनामुळे संघपरिवारासह समाजजीवनात एक पोकळी निर्माण झाली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून आस्थापूर्वक विचारपूस

पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांनी मधुभाईंच्या तब्येतीची आस्थापूर्वक फोन द्वारे विचारपूस केली. काही दिवसापूर्वी सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत त्यांना रुग्णालयात भेटून गेले होते.

## भगवान बाबा बालिकाश्रमास उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे आणि महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांची भेट



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/ विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे आणि महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज छत्रपती संभाजीनगर, सातारा परिसर येथील भगवान बाबा बालिका आश्रमास भेट देऊन येथील मुलींना मिळणाऱ्या सेवा सुविधांची पाहणी केली.

त्यांच्या समवेत पोलीस आयुक्त प्रवीण पवार,महिला बालविकास अधिकारी गणेश पुंगळे तसेच जिल्हा महिला बालविकास अधिकारी कार्यालय आणि विभागीय कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी,भगवान बाबा बालिका आश्रमाच्या संचालिका कविता वाघ यावेळी उपस्थित होत्या.

यावेळी त्यांनी मुलींशी संवाद साधत बालगृहातील अडचणी जाणून घेतल्या. बालगृहातील मुलींनी आपल्या कलागुणातून साकार केलेल्या पेंटिंग्स आणि फ्रेम याविषयी माहिती दिली. मंत्री अदिती तटकरे तसेच नीलम गोऱ्हे यांनी त्यांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले. मुलीशी संवाद साधून कौतुकाची थाप दिली. यावेळी श्रीमती तटकरे यांनी अधिकारी कर्मचाऱ्यांशी तसेच पत्रकारांशी संवाद साधला.

## कर्णपुरा यात्रोत्सव पूर्वतयारी आढावा
## शासकीय योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवा- जिल्हाधिकारी स्वामी




**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी**/कर्णपूरा यात्रोत्सवाच्या पूर्वतयारीचा आढावा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली आज घेण्यात आला. यात्रेत येणाऱ्या भाविकांना सुरक्षा, स्वच्छता आदी सेवा देतांनाच यात्रेच्या निमित्ताने जमणाऱ्या भाविकांपर्यंत शासकीय योजनांची माहिती पोहोचवा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

कर्णपूरा यात्रा पूर्वतयारी आढावा बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, मनपा अपर आयुक्त रणजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा, वाहतुक शाखा उपायुक्त भुजंग तसेच अन्न औषध प्रशासन विभाग, विज वितरण कंपनी, अग्निशमन विभाग, महानगरपालिकेचे सर्व विभाग तसेच छावणी परिसराचे अधिकारी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी निर्देश दिले की, यात्रोत्सवात पिण्याचे स्वच्छ पाणी, स्वच्छता सुविधा, आरोग्य सुविधा व सतर्क पोलीस यंत्रणा यांची सज्जता असावी. सर्व विभागांचा मिळून एक स्वतंत्र नियंत्रण कक्ष स्थापित करावा. खाद्य पदार्थ विक्रेत्यांकडील पदार्थांची तपासणी करावी.

रुग्णवाहिका व अग्निशमन बंब वाहतुकीसाठी पुरेसी जागा असावी. यात्रोत्सवातील आवश्यक परवानग्यांसाठी यात्रा स्थळीच कक्ष स्थापन करावा. यात्रोत्सवात शासकीय योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवा, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. पोलीस दलाने सुरक्षा यंत्रणा सज्ज ठेवावी. सीसीटीव्ही कॅमेरे लावून गर्दीवर नियंत्रण ठेवावे. दामिनी पथक तैनात ठेवावे. याशिवाय साध्या वेशातील पोलीस सज्ज ठेवावे,अशा सुचनाही त्यांनी केल्या.

## देवगिरी सहकारी साखर कारखाना ते पिशोर रोडचे तीनतेरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री /प्रतिनिधी**/ फुलंब्री तालुक्यातील देवगिरी सहकारी साखर कारखाना ते आडगांव, निधोना, पिशोर हा रोड मुख्य रस्ता आहे. या रोडवर जवळपास २० ते २५ गावे गेलेली आहे. या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडल्याने रोडचे तीनतेरा झाले आहे. या विरोधात काल दिनांक १८ सप्टेंबर २०२५ रोजी फुलंब्री च्या तहसीलदार यांच्या कडे या समस्या विषयी संघर्ष शेतकरी संघटना च्या वतीने निवेदन देण्यात आले आहे.तर दिलेल्या निवेदनावर म्हटले आहे की, देवगिरी सहकारी साखर कारखाना ते निधोना आडगाव वाहेगाव रस्त्यांवर मोठ मोठी खड्डे पडली आहे.

## वनपरिक्षेत्रात अवैद्य उत्खनन करणाऱ्या जेसीबीवर वन विभागाची धडक कारवाई

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /उदय कुलकर्णी** / तालुक्यातील कळंकी वनपारिक्षेत्रात राखीव असलेल्या वन कक्ष क्र.१२३ मधील ग.क्र.१६४ मध्ये दि.१५ रोजी एक जेसीबी चालक मालक आपल्या जेसीबीच्या सह्याने अवैधरित्या उत्खलनन करीत असल्याचे वन विभागाच्या कर्मचारी वर्गाचे दृष्टीस येताच त्यांनी आपल्या वरिष्ठांच्या साह्याने सापळा रचून जेसीबी मालक चालक यास जेसीबीसह अटक करून गुन्ह्याची नोंद केली आहे.



सदरची धडक कार्यवाई वनविभागाचे सर्वेसर्वा वनपारिक्षेत्र अधिकारी श्री.शिवाजी टोम्पे,उप वनरक्षक श्रीमती सुवर्णाताई माने,सहाय्यक वन संरक्षक विशाल कवडे यांचे मार्गदर्शनाखाली कळंकी वन परिमंडळ क्षेत्राचे सर्वेसर्वा वन- अधिकारी श्री.एस.पी.कादी,मौजे कळंकी वनरक्षक श्रीमती वैषालीताई तुपे,कळंकी पूर्व,पेडकवाडी वनविभागाचे वनरक्षक ,श्री.ए.एल.नागरगोजे,जामडी वन- विभागाच्या वनरक्षक श्रीमती यशोदाताई साळवे,वन मजूर देविदास राठोड,विभागाचे वाहन चालक भाऊसाहेब वाघ यांनी उत्तर रात्रीपर्यंत ही धडक कार्यवाई केली असुन पुढील अधिकचा कसून तपास वनपरिमंडळ अधिकारी श्री.एस. पी.कादी हे करीत आहे.पुढे त्यांनी असे सूचित केले आहे की,वन- परिक्षेत्रात वीणा परवानगी प्रवेश करणे,अवैध मुरूम, माती,गारगोटी ई. मौल्यवान खनिजांचे अवैद्य उत्खलन करणे कायद्याने गुन्हा असुन या विभागात ट्रॅक्टर, टेम्पो किंवा इतर वाहनांनी या वनात वीणा परवानगी प्रवेश करू नये नसता त्यांचेवर वन विभागाचे कायद्या अंतर्गत कठोरातली कठोर शिक्षा होईल ओ प्रयत्न केले जातील असे वन विभागाने कळविले आहे.

## गंगापूर शहरातील नागरिकांच्या वतीने मुख्य रस्त्यावरील खड्डे तात्काळ बुजविण्याची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी**/ गंगापूर शहरातील मुख्य रस्त्यावरील खड्डे तात्काळ बुजविण्यात यावी या करीता गंगापूर शहरातील काही जागरूक नागरिकांच्या वतीने नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष आगळे यांना निवेदन देऊन मागणी केली असतां मुख्यधिकरी यांनी निवेदनाची तात्काळ दखल घेऊन रस्त्यावर झालेल्या खड्ड्याची पाहणी करुन संबंधित कर्मचाऱ्यांना खड्डे बुजवून्याची सक्त आदेश दिले ..यावेळी सुर्यकांत थोरात , मंगेश जोशी ,बापु खाजेकर, एड महेंद राऊत, टिळे आंबा,सौ कावेरी ताई पाहुणे, अहमद पटेल,असिफ मन्सुरी, ज्ञानेश्वर पवार ,रामेश्वर जाधव,संजय राऊत ,आब्बु चाऊस,गंगापूर शहारातील सुज्ञ नागरीक उपस्थित होते, नागरिकांच्या काय आहे मागण्या अहिल्यानगर ते मनमाड







रोड बंद असेल्याकारणाने सर्व वाहतूक गंगापूर मार्गे वळविण्यात आली असून कायगाव रोड वरील संत सावता महाराज मंदीर समोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानसमोर, राजीव गांधी चौकात व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात खूप मोठे खड्डे पडलेले आहे. दिनांक (१७) सप्टेंबर रोजी सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील खोल खड्यात ट्रकचे टायर फसलेले होतो. आणि सदर ट्रकला जेसीबीच्या सहाय्याने बाहेर काढावे लागले सुदयवाने कोणलाही ईजा झाली नाही पण या खड्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. यासाठी समस्त गंगापूरकर आता आक्रमक झाले असून साखर झोपेत असलेले नगर परिषद प्रशासनास जागी करण्यासाठी निवेदन देत आहोत की डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापासून ते कायगाव रोडवरील संत सावता महाराज मंदीर पर्यन्त पडलेले सर्व खड्डे उद्या शुक्रवार पर्यंत बुजवावे अन्यथा आम्ही समस्त गंगापूरकर शनिवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात रास्तारोको आदोलन करू असा इशारा दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाबाबत सारोळा ग्रामसभेत निर्धार

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /प्रतिनिधी**/ कन्नड तालुक्यातील सारोळा येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त सारोळा येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

ग्रामपंचायत कार्यालयात सकाळी ७:३० वाजता सरपंच सौ. सविता जगन जंगले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ध्वजारोहण शालेय समितीचे उपाध्यक्ष गणेश जंगले यांच्या हस्ते पार पडले.

यानंतर दुपारी १:०० वाजता सांस्कृतिक सभागृहात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाबाबत ग्रामसभा घेण्यात आली. या सभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ. सविता जगन जंगले होत्या,तर प्रमुख उपस्थिती प्रांताधिकारी संपर्कअधिकारी श्रीमती प्राची दवंड, पंचायत समिती कडवड यांच्या होती.ग्रामपंचायत अधिकारी ए. एस.काळे यांनी शासन निर्णय (दि. ६ सप्टेंबर २०२५) वाचून दाखविला. त्यावर ग्रामसभेत सर्वानुमते अभियान यशस्वीपणे राबविण्याचा निर्धार करण्यात आला. तसेच या उपक्रमात प्रथम क्रमांक पटकावण्याचे लक्ष्य ग्रामस्थांनी निश्चित केले.

ग्रामसभेत एकूण सहा समित्या स्थापन करण्यात आल्या. या प्रसंगी तंटामुक्ती समिती अध्यक्ष रत्नाकर पाटील, सोसायटी चेअरमन तेजराव आबा जंगले, या प्रसंगी उपसरपंच भागवत राजपूत,ग्रा.प




सदस्य,रामदास लेणेकर,लक्ष्मण लेणेकर,सत्तार पठाण सांडू गाडेकर.विलास कुंटे.काकासाहेब ढमाले,अजिनाथ ढमाले. जनार्धन बनकर. राजू जंगले नानेश्वर बावस्कर.नानासाहेब बावस्कर नवनाथ टकले सह आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# कोट्यवधींचे नुकसान, जनतेचे हाल - भाजपाची तातडीच्या मदतीसाठी मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)**जालना तालुक्यात सततच्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक भागांत पाणी साचून नागरिकांच्या घरात पाणी घुसले, तर व्यापार, व्यवसाय व शेती क्षेत्रालाही मोठा फटका बसला आहे.

शहरातील बाजारपेठा, दूकाने, घरगुती साहित्य, शेतीमाल व वाहने यांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानाची आज (दि.१८) रोजी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी लक्कडकोट परिसर, हनुमानघाट, खांडसरी परिसर, सेंटमेरी शाळेमागील परिसर, इदगाह रोड परिसर या सह शहरातील अनेक भागात पाहणी केली.या परिस्थितीची गंभीर दखल घेत भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब व महसूलमंत्री मा.ना.श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्राद्वारे तात्काळ पंचनामे करण्यासाठी संबंधितास आदेश देण्याची मागणी केली व तहसीलदार, जालना व आयुक्त, जालना महानगरपालिका व प्रशासनाला तातडीने नुकसानग्रस्तांचे पंचनामे करण्याचे आदेश दिले.

यावेळी त्यांनी म्हटले की, शहरातील सर्वसामान्य नागरिक, व्यापारी व शेतकरीवर्ग मोठ्या संकटात सापडले आहेत. त्यांच्या नुकसानीकडे दुर्लक्ष होऊ नये.

प्रशासनाने युद्धपातळीवर मदतकार्य राबवून तातडीने आर्थिक सहाय्य द्यावे. भास्कर आबा दानवे यांनी पुढे सांगितले की, शासनाकडून मदत येईपर्यंत महापालिका व जिल्हा प्रशासनाने स्थानिक स्तरावर तत्काळ उपाययोजना कराव्यात.

पूरग्रस्त भागांत रोगराई पसरू नाही म्हणून आरोग्य पथके तैनात करावीत, पिण्याच्या पाण्याची सोय करावी तसेच वीजपुरवठा खंडित झालेल्या भागात तत्काळ व्यवस्था करावी. पाणी घरात शिरल्यामुळे नागरिकांची भीषण अवस्था झाली. लहान मुले, महिला व वृद्ध नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. काही ठिकाणी भिंती कोसळल्याच्या घटना तर काही ठिकाणी झाडे उपटून पडल्याने वाहतुकीवरही



परिणाम झाला आहे.यावेळी जिवन सले, धनराज काबलिये, सुनील खरे, संजय डोंगरे, वसंत शिंदे, अमोल कारंजेकर, दुर्गेश कुरील, कल्याण भदनेकर, गेंदालाल झुंगे, सोमेश काबलीये, हेमंत भूरेवाल, विकास कदम, शाम उगले, रोहित नलावडे, अमन मित्तल आदींची उपस्थिती होती.

# संक्षिप्त

## स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आरोग्य शिबीराचे प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा स्त्रि रुग्णालय, आणि जिल्हा सामान्य रुग्णालय जालना येथे आयोजित करण्यात आले आहे. या आरोग्य शिबीरामध्ये लहान मुले व महिलांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. तरी शिबीराचा लाभ गरजू लाभार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

राष्ट्राच्या अरोग्य दृष्टीकोनात बदल घडविण्यासाठी-संपुर्ण देशभर उपचार सेवा आणि पोषण यावर विशेष भर देण्यात येत आहे. या आरोग्य शिबीरात २० प्रकारच्या आरोग्य सेवा देण्यात येणार आहेत. शिबीर सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत करण्यात येणार आहे. आभा कार्डसाठी आधार कार्ड लिंक मोबाईल आवश्यक असल्याने तो सोबत ठेवावा, असेही जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत विविध कर्ज योजनेसाठी वितरीत केलेल्या व थकबाकीदार असलेल्या कर्जदारांसाठी संपुर्ण कर्ज रक्कमेचा एकरक्कमी भरणा केल्यास ५० टक्के थकीत व्याज माफ सवलत योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी महामंडळाच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जालना या जिल्हा कार्यालयाशी दुरध्वनी ०२४८२-२२३४२० वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एस.एम.राठोड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## महामंडळाच्या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करावेत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना व महिला स्वयंसिध्दी व्याज परतावा योजना या संपुर्ण ऑनलाईन स्वरुपात कार्यान्वित आहेत. तरी इतर मागास प्रवर्गातील पात्र अर्जदारास नाव नोंदणीसाठी महामंडळाच्या ु.ीललषवल.ीस या संकेतस्थळावर आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर सादर करावेत. इतर बीज भांडवल योजना व थेट कर्ज योजना या ऑफलाईन स्वरुपाच्या असून त्यांचे अर्ज जिल्हा कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी महामंडळाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जालना या जिल्हा कार्यालयाशी दुरध्वनी ०२४८२-२२३४२० वर संपर्क साधावा, असे जिल्हा व्यवस्थापक एस. एम. राठोड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## छत्रपती संभाजीनगर येथे दोन दिवस फुले शाहू आंबेडकरी जलसा आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र शासन यांच्या वतीने राज्यातील लोककला, लोकपरंपरा व भक्ती परपंराचे जतन व संवर्धन व्हावे तसेच नवीन पिढीला सामाजिक उच्च संस्कृतीची व परंपरेची ओळख नव माध्यमातून व्हावी या उद्देशाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज व संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजसुधारणा कार्याची महती, त्यांचा विचारांचा प्रसार करणाऱ्या शाहिरी, कवना, सत्यशोधकी जलशांची परंपरा जपणारा एक सांस्कृतिक कार्यक्रम आहे, तसेच समाज प्रबोधनात्मक गीतांचा समावेश असणारा फुले शाहू आंबेडकरी जलसा हा कार्यक्रम सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या अभिनव कल्पनेतून व सांस्कृतिक कार्य विभाग सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली १९ व २० सप्टेंबर २०२५ या कालावधीत तापडिया नाट्य मंदिर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.महाराष्ट्रातील दिग्गज कलावंत आपल्या कलेचे सादरीकरण करणार आहेत ज्यामध्ये महाराष्ट्रातील ख्यातनाम शाहीर देवानंद माळी, शाहीर राजा कांबळे, चंद्रकांत प्रल्हाद शिंदे, विजय सरतापे, ख्यातनाम गायिका रागिणी बोदडे, सरला वानखेडे, सपना खरात, चेतन कुमार चोपडे, रामलिंग जाधव यांच्या सुमधुर गितांची मेजवानी आयोजित करण्यात आली आहे.

# निराधार योजनेचे दिव्यांग लाभार्थ्यांना ऑक्टोबर महिन्यापासून २५०० रू मानधन मिळणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी /** संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेंतर्गतच्या दिव्यांग लाभार्थ्यांना मिळणाऱ्या अर्थसहाय्यात वाढ झालेली आहे. अपंग जनता दल सामाजिक संघटना सह विविध दिव्यांग संघटना व स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून शासनाकडे वारंवार मागणी व पाठपुरावा करण्यात आला होता,यासंदर्भात सन २०२५-२६ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये शासनातर्फे संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील पात्र दिव्यांग लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य रुपये १५००/- वरुन रुपये २५००/- इतके करण्याबाबतची घोषणा करण्यात आली होती, त्यानुषंगाने सदरहू योजनेंतर्गत पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना देण्यात येणारे अर्थसहाय्य . दिनांक ०३/०९/२०२५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता मिळाल्यानुसार निर्णय घेण्यात आला.त्यानुसार संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांचे मासिक अर्थसहाय्य रुपये १५००/- वरुन दरमहा रुपये २५००/- करण्यास शासनाकडून मान्यता देण्यात आलेली आहे. विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण सर्वसाधारण / अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी करण्यात आलेल्या मंजूर तरतूदीमधून करण्यात येणार असून,सदर अर्थसहाय्यातील वाढ ही संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना या योजनेतील सर्व दिव्यांग लाभार्थ्यांना लागू राहील.विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण डी.बी.टी. पोर्टलद्वारे थेट त्यांच्या आधार संलग्न खात्यात करण्यात येईल.व




सदरची वाढ ही ऑक्टोबर, २०२५ पासून लागू राहील.अशी अधिकृत माहिती अपंग जनता दल सामाजिक संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष शेख जाकीर यांनी दिली.

# कन्नड तालुका छायाचित्रकार संघटनेचा स्नेहमिलन सोहळा साखरवेल येथे संपन्न


**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /प्रतिनिधी/**संघटनेत एकत्रित राहणे हीच खरी ताकद आहे. विधायक कार्यासाठी संघटना सक्षम असावी लागते. पारदर्शक कारभारातून सभासदांचा विश्वास वृद्धिंगत होतो. सदस्यांमध्ये परस्पर सुसंवाद आणि संघटित राहून व्यवसाय केल्यास प्रगतीची गती निश्चितच वेगवान होते, असे प्रतिपादन साहित्यिक तथा व्याख्याते प्रा. डॉ. संजय गायकवाड यांनी केले.

ते कन्नड तालुक्यातील साखरवेल येथे गुरुवारी पार पडलेल्या कन्नड तालुका छायाचित्रकार संघटनेच्या स्नेहमिलन सोहळ्यात बोलत होते. या सोहळ्यात नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.नूतन कार्यकारिणीमध्ये संस्थापक विभाग अध्यक्ष म्हणून कैलास निकम, अध्यक्षपदी अमोल दत्ता मोरस्कर तर उपाध्यक्षपदी अमोल शेषराव जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सचिव म्हणून राजू राजपूत, सहसचिव नामदेव साळुंखे, कोषाध्यक्ष भगिनाथ मोकासे तर मार्गदर्शक म्हणून उमेश भालेराव, प्रल्हाद राजपूत आणि राहुल दत्ता पवार यांची निवड झाली.

या सोहळ्यास मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून केतन काजे, ज्येष्ठ छायाचित्रकार मुस्तफा हुसैन, भाऊसाहेब पवार, ज्येष्ठ पत्रकार व कवी दत्ता मोरस्कर, ज्ञानविकास विद्यालयाचे मुख्याध्यापक रायभान जाधव, उद्योजक राजेंद्र घुगे तसेच ज्येष्ठ छायाचित्रकार प्रल्हाद राजपूत उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक रायभान जाधव यांनी फोटोग्राफीचे बदलते स्वरूप अधोरेखित केले. तर संस्थापक




अध्यक्ष मुस्तफा हुसैन अंकल व उपाध्यक्ष भाऊसाहेब पवार यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा सादर केला.

या कार्यक्रमाला नंदू डीघोळे, अनिल आव्हाड, दिलीप केवट, गणेश जंजाळ, गणेश बनकर, गणेश कोल्हे, पप्पू वरकड, भाऊसाहेब सोनवणे, आदी गंगवाल, अजय जाधव, संदीप बोरसे, रसूल शहा, कुणाल पवार, छोटू राजपूत, यांच्यासह तालुक्यातील छायाचित्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सूत्रसंचालन सहयोग जावळे यांनी केले.

# भारतीय बौद्ध महासभेचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** भारतीय बौद्ध महासभा, वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांच्या वतीने गुरुवार, दि. १८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजेच्या सुमारास विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी तथागत भगवान गौतम बुद्ध यांची मूर्ती मोती तलावात बसविण्याच्या मागणीसह बोधगया येथील महाबोधी महाविहार भारतीय बौद्ध महासभेच्या ताब्यात देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी यांना



निवेदनही देण्यात आले.

दरम्यान, बोधगया येथील महाबोधी महाविहार हे भारतीय बौद्ध महासभेच्या ताब्यात देण्यात यावे, १९४९ चा कायदा रद्द करण्यात यावा, नागपूर येथील दीक्षा भूमीची जागा तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी आंबेडकरी घराण्याच्या नावाने दिली आहे. मात्र, आजपर्यंत स्मारक समितीने ती ताब्यात दिलेली नाही. त्यामुळे ती जागा आंबेडकरी घराण्याच्या ताब्यात देण्यात यावी, महू येथील आंबेडकर स्मारकाचे व्यवस्थापन भारतीय बौद्ध महासभेकडे देण्यात यावे, तसेच जालना येथील मोती तलावात भगवान गौतम बुद्ध यांची मूर्ती बसविण्यात यावी, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या. या मोर्चात आंबेडकरी समाजासह महिला-पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सदरील आंदोलन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष राजेश सदावर्ते यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी भंते राजरत्न, महेंद्र बनकर, दीपक डोके, महेंद्र रत्नपारखे, हरीष रत्नपारखे, गौतम वाघमारे, विष्णू खरात, माधव पात्रे, कुणाल दहिवाले, मीना झिने, समाधान खरात, दिनकर मगरे, बाबुराव साळवे, मिलिंद मगरे, सूर्यभान घोरपडे, गौतम हिवाळे, कांता बोर्डे, ज्योतीताई खरात, राजकुमार खरात, विनोद जाधव, अंकुश लांडगे, देविदास पैठणे, प्रकाश राऊत, करुणा साळवे, कल्पना वेलदोडे, सखाराम काळे, सखाराम कोळे, कुलदीप गरड, सुरेश काळे, अशोक लबडे, प्रशिक सम्राट, शेषराव सोनवणे, मालती घोरपडे, प्रमोद हिवाळे, गुमनराव पारखे, भारत घोरपडे, कमलकिशोर जोगदंड यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

मोती तलावात भगवान गौतम बुद्ध यांची मूर्ती बसविण्याची मागणी गेल्या तीस वर्षांपासून होत आहे. मात्र शासन आणि प्रशासन यांच्या हलगर्जीपणामुळे हे काम अद्याप झालेले नाही. आतापर्यंत बी.एम. साळवे, शेषराव जाधव यांच्यासह अनेकांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. परंतु त्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही. हुसैन सागर च्या धर्तीवर ठराव घेऊन बुद्धमूर्ती बसविण्यात यावी, असा विचार झाला होता. परंतु त्यावर कुणीही चर्चा करण्यास तयार नाही, तसेच स्मारक नेमके कसे असेल हेही स्पष्ट केले जात नाही. अजिंठा आणि जालना हे जवळ असल्याने तसेच जालना-जळगाव रेल्वेमार्ग तयार होत असल्याने जालना येथे बौद्ध सर्किट तयार होण्यास मोठी चालना मिळेल. त्यामुळे देश-विदेशातील पर्यटकांच्या माध्यमातून मोठे उत्पन्न निर्माण होईल, असे आंदोलकांनी सांगितले. या आंदोलनावेळी समता सैनिक दलाचे जवान उपस्थित होते.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची गट-क अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा रविवारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे मार्फत आयोजीत, महाराष्ट्र गट-क अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा रविवार दि. २१ रोजी होणार आहे.

ही परीक्षा सकाळी ११ ते १२ व दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत अशा दोन सत्रात होणार आहे. छत्रपती संभाजीनगर या जिल्हाकेंद्रावर एकूण १२ केंद्रांवर ३९६० परीक्षार्थींची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे.परीक्षेसाठी एकूण ४२३ अधिकारी/ कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे, असे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती संगिता राठोड यांनी कळविले आहे.

परीक्षा केंद्रांची यादी याप्रमाणे-

१.न्यू हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, पिसादेवी रोड, भगतसिंग नगर हर्सुल, (२८८)

२.मौलाना आझाद महाविद्यालय, कला, विज्ञान व वाणिज्य शाखा, रोजाबाग पार्ट - अ (२८८)

३.मौलाना आझाद महाविद्यालय, कला, विज्ञान व वाणिज्य शाखा, रोजाबाग पार्ट - ब (२८८)

४. एम.जी.एम. जवाहरलाल नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय, सेव्हन हिल (४८०)

५.अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्यालय, एमजीएम विद्यापीठ, एन- ६ (२८८)

६.सरस्वती भूवन विज्ञान महाविद्याालय, औरंगपूरा (२६४)

७.सरस्वती भूवन मुलाची शाळा, औरंगपूरा (४३२)

८.विवेकानंद कला व सरदार दिलिपसिंह वाणिज्य महाविद्यालय, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर - (२८८)

९. विवेकानंद विज्ञान महाविद्यालय, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर -(२८८)

१०.शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय उस्मानपूरा (२८८)

११.शासकीय तंत्रनिकेतन,महाविद्यालय, उस्मानपूरा (२८८)

१२. शासकीय कला व विज्ञान महाविद्यालय, सुभेदारी गेस्ट हाऊस जवळ विश्वास नगर (२८८)

परिक्षार्थींसाठी सुचनाः

परिक्षेस येताना उमेदवाराने ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणुक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा स्मार्ट कार्ड इत्यादी प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान कोणतेही एक मुळ ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे.

परिक्षेच्या वेळी कक्षात प्रवेशप्रमाणपत्र, काळ्या व निळ्या शाईचे बॉलपॉइंट पेन, ओळखपत्र व ओळखपत्राची छायांकीत प्रत या व्यतिरिक्त अन्य कोणतेही साहित्य अथवा वस्तु परीक्षा कक्षामध्ये घेऊन जाण्यास उमेदवारास परवानगी असणार नाही.

उमेदवारास त्याच्यासोबत डिजीटल डायरी, मायक्रोफोन, मोबाईल, ब्लुटुथ, कॅमेरा, फोन किंवा तत्सम कोणतेही संदेशवहन उपकरण, इलेक्ट्रॉनिक साहित्य परीक्षा कक्षामध्ये घेऊन जाण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणले तर उमेदवारांना स्वत: च्या जबाबदारीवर परीक्षा केद्रांच्या आवाराच्या मुख्य दरवाजाबाहेरच ठेवावे लागेल. तसेच असे साहित्य ठेवण्याची जबाबदारी आयोगाची असणार नाही.

परीक्षा केंद्राच्या आवाराच्या मुख्य दरवाजाच्या आत असे साहित्य आणल्यास उमेदवारांवर फौजदारी व प्रशासकीय कारवाईसह त्यांना आयोगाच्या आगामी परिक्षांकरिता बंदी घालण्यात येईल.

सुधारीत कार्यपद्धतीनूसार प्रत्यक्ष परीक्षा सुरू होण्याच्या दीड तास अगोदर उमेदवारांना प्रवेश देण्यात येऊन अर्धा तास अगोदर परीक्षा इमारतीचे मुख्यद्वार बंद करण्यात येणार आहे.

परीक्षा कक्षात शेवटच्या प्रवेशासाठी निर्धारीत केलेल्या वेळेनंतर आलेल्या उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत परीक्षेसाठी प्रवेश देण्यात येणार नाही.

परीक्षेच्या पर्यवेक्षणाकरिता आयोगाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. परीक्षेच्या पर्यवेक्षणाकरिता जिल्हाधिकारी स्वत: लक्ष ठेवणार आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Mundhe Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (Editor - Sugriv Sopanrao Mundhe) Office Ph. : 0240-2474813